# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः11.09.2025** **वारःगुरुवार**

---

- पंतप्रधान आज उत्तरप्रदेश आणि उत्तराखंडच्या दौऱ्यावर
- केंद्रीय आर्थिक व्यवहार समितीकडून रेल्वेच्या विविध प्रकल्पांना मंजुरी
- लहान उपग्रहांच्या उड्डाणासंदर्भात इस्रो आणि न्यूस्पेस इंडियादरम्यान करार
- नेपाळमधील संघर्षाच्या पार्श्वभुमीवर सीमा सुरक्षेत वाढ, प्रवाशांच्या मदतीसाठी विशेष उड्डाणांची घोषणा आणि
- आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत भारताची युएईवर ९ गडी राखून मात.

__पंप्रउप्रउखं__

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड दौऱ्यावर जात आहेत. वाराणसीमध्ये पंतप्रधान मॉरीशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांची भेट घेतील. पंतप्रधानांनी मार्चमध्ये मॉरीशसला भेट देऊन, प्रगत धोरणात्मक भागीदारी वृद्धींगत करण्याविषयी चर्चा केली त्या पार्श्वभुमीवर हा दौरा होत आहे. दोन्ही नेत्यांदरम्यान होणाऱ्या द्वीपक्षीय चर्चेमध्ये, विकास भागीदारी आणि क्षमता बांधणीवर लक्ष केंद्रित करणाऱ्या सहकार्याच्या व्याप्तीचा आढावा घेतील. तसेच आरोग्य, विज्ञान आणि तंत्रज्ञान, ऊर्जा, पायाभूत सुविधा यांसह उदयोन्मुख नवीकरणीय ऊर्जा,डिजीटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि सागरी अर्थव्यवस्था या क्षेत्रातील भविष्यकालीन संधींवर चर्चा करतील. हिंद महासागर क्षेत्रातील नेबरहूड फर्स्ट धोरणाच्या दृष्टीने मॉरिशस भारतासाठी महत्त्वाचा आहे.

रामगुलाम यांचं काल संध्याकाळी सात दिवसांच्या भारत भेटीसाठी वाराणसी इथं आगमन झालं. उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल यांनी त्याचं स्वागत केलं तसंच त्यांना मानवंदना देण्यात आली दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उत्तराखंडच्या पूरग्रस्त भागाची हवाई पाहणी करणार आहेत, त्यानंतर यासंदर्भात डेहराडून इथं त्यांच्या अध्यक्षतेखाली, बचाव आणि पुनर्वसन कार्याचा आढावा घेणारी उच्चस्तरीय बैठक होणार आहे.

मंत्रीमंडळरेल्वे

पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या आर्थिक व्यवहार समितीच्या बैठकीत काल दिल्लीत, चार पदरी हरितक्षेत्र महामार्ग बांधणे आणि १७७ किलोमीटर लांबीच्या रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरण या एकंदर साडेसातशे कोटी रुपयांहून अधिक मूल्यांच्या दोन प्रमुख पायाभूत सुविधा प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल दिल्लीत वार्ताहर परिषदेत माहिती देताना समितीच्या विविध निर्णयांची घोषणा केली. आर्थिक व्यवहार समितीने बिहार, झारखंड आणि पश्चिम बंगालमधील भागलपूर -दुमका- रामपूरहाट एकेरी रेल्वे मार्गाच्या १७७ किलोमीटर लांबीच्या मार्गाच्या दुपदरीकरणाला मान्यता देण्यात आली असल्याचीही माहिती त्यांनी दिली.

बिहारमधील बक्सर-भागलपूर अति वेगवान क्षेत्रातील नियंत्रित प्रवेश असलेल्या मोकामा-मुंगेर विभागाच्या चार-पदरी हरित महामार्ग बांधण्यास सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्वावर बांधण्याची परवानगी देण्यात आली आहे.  या प्रकल्पाची एकूण लांबी ८२ किलोमीटरपेक्षा जास्त असून त्याचा भांडवली खर्च जवळपास साडेचार हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त असेल.

**इस्रो**

लहान उपग्रहांच्या उड्डाणांसंदर्भातील स्मॉल सॅटेलाईट लॉन्च व्हेईकल म्हणजेच एसएसएलव्ही तंत्रज्ञानाच्या हस्तातरणासाठी न्यूस्पेस इंडिया लिमिटेड आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच इस्रो यांच्या दरम्यान तंत्रज्ञान हस्तांतरण करार काल पार पडला. इस्रोने विकसित केलेले हे जलद, मागणीनुरूप काम करणारे लॉन्च व्हेईकल म्हणून तयार करण्यात आले आहे. लहान उपग्रहांच्या प्रक्षेपणाच्या वाढत्या जागतिक बाजारपेठेत शिरकाव करून त्यात अव्वल राहाण्याचं उद्दीष्ट यामध्ये ठेवण्यात आलं आहे. यासंदर्भात समाज माध्यमांवरील संदेशात, हा करार देशातील अंतराळ क्षेत्रातील सुधारणांमधला महत्त्वाचा टप्पा असल्याचं इस्रोनं नमूद केलं आहे. यामुळे या व्हेईकलच्या व्यावसायिकरणाचा मार्ग मोकळा होत असल्याचंही त्यात म्हटलं आहे.

**गृहअशा**

गुजरातच्या सानंद मतदारसंघात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते काल दूरस्थ प्रणालीच्या माध्यमातून ६६ कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी करण्यात आली. मतदारसंघाच्या समग्र विकासाचे वचन देताना, सानंदमधील प्रत्येक गावामध्ये २०२९सालापर्यंत पाणी पुरवठा, रस्ते, आरोग्य, स्वच्छता आणि वनीकरण या पायाभूत सुविधा पुरवण्यात येतील असं अमित शहा म्हणाले. ढोलेरा विशेष गुंतवणूक क्षेत्र कार्यान्वित झाल्यानंतर आणि सानंदच्या परिसरातील औद्योगिक विकासात्मक प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सानंद  औद्योगिकदृष्ट्या सर्वाधिक विकसित तालुका म्हणून पुढे येईल. याच क्षेत्रात, व्यावसायिक सामाजिक जबाबदारीच्या माध्यमातून जवळपास दीडशे कोटी रुपयांपर्यंतच्या विकास प्रकल्प नियोजित आहेत. उद्योजकांच्या अलीकडील चर्चेच्या आधारे भक्कम प्रशासकीय आराखडा तयार करण्यात आला आहे.

नेपाळ

नेपाळमधील अलीकडील घडामोडींमुळे तिथं अडकलेल्या प्रवाशांना मदत करण्यासाठी एअर इंडिया आणि इंडिगोनं दिल्ली ते काठमांडू आणि परत येण्यासाठी विशेष उड्डाणांची घोषणा केली आहे. नियोजित उड्डाणे सुरू झाली आहेत आणि आजपासून पुन्हा सुरू होतील असं सांगून एयर इंडियानं प्रवाशांना त्यांच्या संकेतस्थळावर उड्डाणांची स्थिती तपासण्यास सांगितलं आहे. इंडिगोद्वारे काठमांडूसाठी दररोज चार उड्डाणे पुन्हा सुरू होतील. प्रवाशांना सुरक्षितपणे परत आणण्यासाठी समर्पित दोन विशेष मदत उड्डाणे देखील चालवली जातील असं कंपनीनं काल एका निवेदनात सांगितलं. दरम्यान, केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री किंजरापु राम मोहन नायडू यांनी विमान कंपन्यांना प्रवासी तिकीटाची किंमत वाजवी ठेवण्याचा सल्ला दिला आहे.

**<u>नेपाळअंतरिमसरकार</u>**

नेपाळमध्ये, काल काठमांडू इथं झालेल्या मेळाव्यात नव्या पिढीच्या प्रतिनिधींच्या एका गटाने, अंतरिम सरकारचे नेतृत्व म्हणून माजी मुख्य न्यायाधीश सुशीला कार्की यांचे प्रस्तावित केले.मात्र यामुळे असंतोषाची परिस्थिती निर्माण होत अनेक तरूणांनी याचा निषेध नोंदवला. नेपाळ लष्कराने आज सकाळी ६ वाजेपर्यंत देशभरात संचारबंदी लागू केली होती.

**<u>नेपाळसीमासुरक्षा</u>**

बिहार, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमधील भारत-नेपाळ सीमेवरील सुरक्षा वाढवण्यात आली आहे. व्यापारी चौक्या आणि इतर प्रवेश जागांवरही विशेष दक्षता घेण्यात आहे. दरम्यान पोलीस आणि सशस्त्र सीमा दलही सीमापार हालचालींवर बारकाईनं लक्ष ठेवून आहेत. नेपाळच्या अधिकाऱ्यांच्या सूचनेवरून, नेपाळ ते भारताच्या जयनगर दरम्यानची रेल्वे सेवा पुढील सूचना येईल पर्यंत स्थगित करण्यात आली आहे.

**<u>पुढीलपिढी</u>**

नव्या पिढीच्या जीएसटी सुधारणांच्या अंतर्गत, केंद्र सरकारनं घरगुती इलेक्ट्रॉनिक वस्तू अधिक परवडणाऱ्या बनवून मध्यमवर्गाला दिलासा दिला आहे. वातानुकूलन यंत्र, भांडी धुण्याचं यंत्र आणि एलसीडी/एलईडी टीव्ही यासारख्या उत्पादनांवरील जीएसटी दर २८ टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आले आहेत. या कपातीमुळं या उपकरणांची मागणी थेट वाढेल, आणि देशांतर्गत उत्पादकांना बाजारपेठ विस्तारण्यास मदत होईल. या करकपातीबद्दल केंद्राचे आभार मानताना, मोबाइल आणि इलेक्ट्रॉनिक उपकरण निर्यात प्रोत्साहन परिषदेचे संचालक देश राज भदाना यांनी नवीन जीएसटी सुधारणांमुळं देशांतर्गत मागणी आणि घरगुती वापर वाढेल असा विश्वास व्यक्त केला आहे.

**<u>गोयल</u>**

अमेरिकेच्या बरोबरच्या द्वीपक्षीय कराराला अंतिम रूप देण्यासाठी सरकार सक्रीयतेने अमेरिकेच्या संपर्कात असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी म्हटलं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यादरम्यान झालेल्या व्यापारविषयक चर्चा आणि द्विपक्षीय संबंधांमधील वाढत्या सुलभतेविषयी सकारात्मक टिप्पणी जाहीर झाल्यानंतर गोयल यांनी हे वक्तव्य केले आहे. दिल्लीत काल भारतीय वाणिज्य आणि उद्योग महासंघ अर्थात फिक्कीच्या नेतृत्व संबंधित शिखर

संमेलनामध्ये गोयल बोलत होते. युरोपीय संघ आणि न्यूझीलंड समवेत देखील व्यापार वाटाघाटी सुरू असल्याचं सांगून ओमानसमवेत व्यापार कराराला अंतिम रूप प्राप्त होण्याची अपेक्षा आहे.

**पंप्रकतार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल कतारच्या अमीर शेख तमीम बिन हमद अल थानी यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. अलीकडेच दोहावर झालेल्या हल्ल्यांविषयी तीव्र चिंता मोदी यांनी व्यक्त केली. समाज माध्यमांवरील संदेशात मोदी यांनी, कतारच्या सार्वभौमत्वाच्या उल्लंघनाचा निषेध व्यक्त करतो असं नमूद करून संवाद आणि राजनैतिक मुत्सद्देगिरीद्वारे समस्या उकल तसंच तणाव टाळण्यासाठी भारत कायम पाठिंबा देईल असं म्हटलं आहे. कतारच्या प्रादेशिक शांतता आणि स्थिरतेला चालना देण्याच्या भूमिकेचे मोदींनी कौतुक केले आहे.

**लष्करमाजीसैनिक**

कोलकाता उच्च न्यायालयाने, भारतीय लष्कराच्या माजी सैनिकांना आज मैदान परिसरातील गांधी पुतळ्याजवळ निदर्शने करण्यात परवानगी दिली आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी लष्कराविषयी केलेल्या कथित टिप्पणीच्या पार्श्वभुमीवर ही परवानगी दिली आहे. कोलकातामधल्या पूर्व कमांडने लष्करी अधिकाऱ्यांनी त्यांच्या हद्दीतील तृणमूल काँग्रेसचे व्यासपीठ हलवल्यानंतर ममता बॅनर्जींनी लष्कराविषयी टिप्पणी केली होती. हे व्यासपीठ हलवण्याविषयी वारंवार सूचना देऊनही तृणमूलने त्याकडे दुर्लक्ष केल्यानंतर लष्कराने ही कारवाई केली होती. या घटनेविषयी बॅनर्जी यांनी केलेल्या टिप्पणींच्या पार्श्वभुमीवर न्यायालयाने काही निर्बंधांसह लष्कराला ही परवानगी दिली आहे.

या निदर्शनांमध्ये भाजत नेत्यांना सहभागी होण्याची परवानगी नाही तसंच सहभागींच्या नावाची आगाऊ यादी स्थानिक पोलिसांना सादर करावी लागेल. दरम्यान, या प्रकरणावरून पश्चिम बंगाल विधानसभेतही याचे पडसाद उमटले. राजकीय गोंधळात विरोधी पक्षनेते शुभेंदू अधिकारी यांना विशेष अधिवेशनातून निलंबित करण्यात आले आहे.

**हवामान**

ओडिशातील काही मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा केशरी बावटा हवामान विभागाने दिला आहे. अंदमान आणि निकोबार बेटे, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशचा काही भाग, छत्तीसगड, झारखंड, आंध्र प्रदेशचा किनारी भाग, पश्चिम बंगाल, सिक्कीम आणि ईशान्येकडील राज्यांत पुढील दोन तीन दिवस हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर महाराष्ट्र, उत्तराखंडसह काही भागात विजांसह वादळाचा अंदाजही हवामान विभागाने वर्तवला आहे.

**आशियाकरंडक**

दुबई इथं सुरू असलेल्या आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत, अ गटात भारताने काल संयुक्त अरब अमिराती संघावर ९ गडी राखून विजय मिळवला. युएईच्या संघानं ५८ धावाचं लक्ष्य भारतापुढे ठेवलं होतं, ते केवळ ४ षटकं आणि तीन चेंडूत पूर्ण करताना केवळ एक गडी गमावला आहे. अभिषेक वर्मानं १६ चेंडूत ३०

धावा केल्या तर त्याला शुभमन गिलने २० धावा करत साथ दिली. तत्पुर्वी भारतानं युएईला १३ षटकं १ चेंडूत ५७ धावांवर बाद केले.

## **याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**